जा.क्र.नांवाशमनपा/नसका/CR- / ०५/२०१६
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.
दिनांक:- ०८.०८.२०१६

**दिनांक १०.०८.२०१६ रोजीच्या आयोजीत करण्यात आलेल्या सर्वसाधारण सभेची पुरवणी विषय पत्रिका**

**विषय क्रं.०१**

दिनांक ०५.०१.२०१६, २९.०२.२०१६, १९.०३.२०१६ रोजीची अंदाजपत्रकिय विशेष सभा ३१.०५.२०१६, ०२.०७.२०१६ रोजीची अंदाजपत्रकिय विशेष सभा दुपारी ३.०० वाजता, ४.३० वाजता व ५.३० वाजता मागील झालेल्या सभेचे इतिवृत्त कायम करणे बाबत

**विषय क्रं.०२**

महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग, मंत्रालय मुंबई यांनी शासन निर्णय क्रं. महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग, शासन परिपत्रक क्रं. ठामपा2002/821/प्रक्र.86/नवि-23/दि.2 जुलै, 2008 नुसार शासनाने महापालिकेतील अधिकारी/कर्मचारी मॉडेल सेवा प्रवेश नियम तयार करण्याच्या दृष्टिने कालबध्द कृती कार्यक्रम आखुन दिला त्यानुसार महापालिकेतील अधिकारी/कर्मचारी यांचे सेवा प्रवेश नियम तयार करण्यात आले त्यात सरळ सेवेने भरावयाचे विविध संवर्गातील पदाबाबत वयाची अट ही महाराष्ट्र शासनाचे धोरण आणि महाराष्ट्र लोकसेवा आयोग यांनी विहित केलेली विविध पदांची वयोमर्यादा निश्चीत करण्यात आली तसेच पदोन्नतीसाठी आवश्यक अनुभवाची मर्यादा शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाचे दिनांक 25.02.2005 च्या शासन निर्णयातील निर्देशानुसार कर्मचारी/अधिकारी यांच्या हरकती व सुचनांवर रितसर सुनावणी घेऊन नमुना सेवा प्रवेश नियम तयार करून दिनांक 20.09.2008 रोजी सर्व साधारण सभे समोर मान्यतेसाठी सादर केले होते सर्वसाधारणसभेने दिनांक 08.08.2011 रोजीच्या सभेत ठराव क्रमांक 94 द्वारे महापालिकेच्या प्रस्तावीत मॉडेल सेवा प्रवेश नियमास मान्यता प्रदान केल्यानंतर महानगरपालिकेने दिनांक 09 जुलै 2012 रोजी तयार केलेले मॉडेल सेवा प्रवेश नियम शासन असाधारण राजपत्रात प्रसिध्द करण्यासाठी शासकीय मुद्रानालय औरंगाबाद येथे प्रसिध्दीसाठी पाठविलेले आहेत.

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाचे शासन निर्णय दिनांक 4 मे 2006 अन्वये राज्यातील अ ते ड वर्ग महानगरपालिकेत 38 पदांचा आकृतीबंध निश्चीत केला असून उर्वरीत पदासाठीचा आकृतीबंध निश्चीत करण्यात बाबत आवश्यकते निर्देश दिलेले आहेत. त्यानुसार महानगरपालिकेचे वाढीव क्षेत्रफळ, लोकसंख्या व आस्थापना खर्च 35 % ची मर्यादा ज्यामध्ये वेतन,निवृत्ती वेतन, कार्यालयीन खर्च, वहान, इंधन, स्टेशनरी व बैठकावरील खर्च या सर्व बाबी विचारात घेवून आकृतीबंध निश्चीत करण्याबाबत निर्देश देण्यात आले आहेत त्यानुसार महानगरपालिका सर्वसाधारण सभेने 31.08.2013 रोजी ठराव क्रमांक 126 द्वारे महापालिका आयुक्तांनी लवकरात लवकर महापालिकेतील कर्मचारी आकृतीबंधाचा प्रस्ताव तयार करून शासनास सादर करावा अशी मान्यता दिलेली आहे त्यानुसार महापालिका कर्मचारी आकृतीबंधाचा प्रस्ताव तयार करण्यापुर्वी कार्यालयीन पत्र क्रमांक 22939/2013 दिनांक 16.12.2013 च्या परिपत्रकाद्वारे सर्व विभाग प्रमुखांना आवश्यकती माहिती सादर करण्यास सुचना देण्यात आल्यानंतर सर्व विभाग प्रमुखांची आकृतीबंध अंतीम करण्यासाठी दिनांक 30.05.2014 रोजी बैठक आयोजीत करण्यात आली आणि विभाग प्रमुखांच्या सुचनांनुसार या कार्यालयाचे पत्र दिनांक 16.03.2015 अन्वये आकृतीबंधाची कार्यवाही अंतीम टप्यात असल्याचे शासनास कळविण्यात आले.

शासनाचे पत्र दिनांक 17.08.2015 चे पत्रास अनुसरून शहराची वाढती लोकसंख्या, नागरी भागाचा विकास, शासनाच्या विविध योजना व त्यानुरूप वाढलेले कामकाज या बाबीचा विचार करून महानगरपालिकेच्या विभाग प्रमुखा मार्फत आवश्यक असणा-या पदांचा आढावा घेवून भविष्यातील 25 वर्षाच्या दृष्टिने उपयोगी पडणारा कर्मचारी आकृतीबंधचा प्रस्ताव, उपसचिव, नगरविकास विभाग मंत्रालय मुंबई यांच्या सुचनेनुसार वसई विरार महानगरपालिकेचे कर्मचारी आकृतीबंध व सेवा प्रवेश नियमास महानगरपालिका सर्वसाधारण सभेच्या मंजुरीच्या अधिन राहुन शासनाने मंजुरी दिलेली आहे त्याच धर्तीवर कर्मचारी मॉडेल सेवा प्रवेश नियमासहीत कर्मचारी आकृतीबंधाचा प्रस्ताव दिनांक 05.09.2015 च्या पत्राद्वारे शासन मान्यतेसाठी शासनाकडे सादर करण्यात आलेला आहे.

महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग (नवी-24) चे कक्ष अधिकारी यांनी त्यांचे पत्र दि.28.01.2016 अन्वये कळविले की, मा.महापौर यांनी सेवा प्रवेश नियम व कर्मचारी आकृतीबंधाचे अनुषंगाने उपस्थित केलेल्या मुद्यांनुसार अहवाल सादर करावा त्यास अनुसरून या कार्यालयाचे पत्र क्रमांक 14450/2016 दिनांक 05.02.2016 अन्वये महापालिकेचा ठराव क्रमांक 94 दिनांक 08.08.2011 आणि ठराव क्रमांक 126 दिनांक 31.08.2013 नुसार मॉडेल सेवा प्रवेश नियम आणि कर्मचारी आकृतीबंधाचा संयुक्त प्रस्तावाचा अहवाल शासन मान्यतेसाठी सादर करण्यात आलेला आहे. सदरचा मॉडेल सेवा प्रवेश नियम आणि कर्मचारी आकृतीबंधाचा संयुक्त प्रस्ताव महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाचे शासन परिपत्रक दिनांक 02 जुलै 2008 मधिल निर्देशांनुसार मान्यतेस्तव महापालिका सर्वसाधारणसभे समोर सादर करण्यात येत आहे.

**विषय क्रं.०३**

कार्यालयीन आदेश क्रं. नावाशमनपा/साप्रवि/५८८१/२०१६ दिनांक ०५.०८.२०१६ अन्वये **श्री विजय निलंगेकर अध्यक्ष एकनिष्ठ प्रतिष्ठान नांदेड** यांचे निवेदनाव्दारे दरवर्षीप्रमाणे बुध्द जयंती निमित्ताने दिनांक २१ मे २०१६ रोजी बुध्द प्रभात या सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असल्याचे कळविले असून सदर कार्यक्रमासाठी महानगरपालिके तर्फे गतवर्षी प्रमाणे आर्थीक मदत देण्यात यावी अशी विनंती केली होती. त्याअन्वये सदर निवेदनानुसार मा. महापौर, मा.सभापती स्थायी समिती, मा. सभागृहनेता, मा. विरोधीपक्षनेता मनपा नांदेड यांचेकडे सदरील प्रकरणी अभिप्राय देण्यासाठी मान्यतेस्तव सादर करण्यात आले होते त्यानुसार मा. महापौर मनपा नांदेड यांनी संबंधीतांची नियमानुसार कागदपत्रे तपासून व पुर्तता करुन घ्यावी अशी सुचना दिल्या असुन, मनपाची आर्थीक स्थीती पहाता रुपये ५०,०००/- (अक्षरी रुपये पन्नास हजार) अनुदान देण्यास मा. महापौर मनपा नांदेड यांचा अभिप्राय दिनांक १८.०५.२९०१६ अन्वये मान्यता दिली आहे

त्यानुसार संबंधीतांनी बुध्द प्रभात या कार्यक्रमास अनुदान मिळण्यासाठी खालील प्रमाणे कागदपत्र सादर केलेले आहेत.

१) एकनिष्ठ प्रतिष्ठान नांदेड या संस्थचा ठराव दिनांक १४.०४.२०१६

२) संस्थेचे नोंदणी प्रमाणपत्र (सहाययक संस्था निबंधक नांदेड विभाग)

३) संस्थेचे नोंदणी प्रमाणपत्र (सहाय्यक धर्मादाय आयुक्त नांदेड विभाग)

४) संस्थेचे परिशिष्ट व ज्ञापन (मेमोरंडम ऑफ असोसिएशन)

५) संस्थेच्या वार्षीक लेखापरिक्षण अहवाल

६) चार्टड अंकाऊंटंट यांच्या मार्फत झालेल्या लेखापरिक्षणाचा अहवाल

मनपा सर्वसाधारण सभेची मान्यता अपेक्षीत गृहित धरुन वरील कार्यक्रमासाठी रु. ५०,०००/- (अक्षरी रुपये पन्नास हजार फक्त) चे अनुदान देण्याची कार्योत्तर प्रशासकिय व आर्थीक मंजुरी देण्यात आली त्यास मान्यतेसतव सादर. सदर रक्कमेचा धनादेश **एकनिष्ठ प्रतिष्ठान नांदेड** यांच्या नांवे देण्यात यावा यावर होणारा खर्च सालसन २०१६-१७ च्या संबंधीत शिर्षकाखालील तरतुदीतुन करण्यात यावा त्यास कार्योत्तर प्रशासकिय आर्थीक मंजुरी देण्यासाठी मनपा सर्व साधारण सभेसमोर सादर.

**विषय क्र.०४**

महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग शासन निर्णय क्र. संकिर्ण/2015/प्र.क्र.90/नवि-16 मंत्रालय मुंबई-32 दि. 16 जानेवारी 2016 चे कृपया अवलोकन व्हावे.राज्यातील नागरी स्थानिक स्वराज्य संस्था यांच्या हद्दितील रस्त्यांची देखरेख - दुरुस्ती, रस्ता बांधणी, रस्त्यांचे डांबरीकरण, मोठया प्रमाणात नादुरुस्त झालेल्या रस्त्यांची पुर्नबांधणी, रस्ता-पुल व रेल्वे-पुल बांधणी, पदपथ बांधणी, भुयारी रस्ता इत्यादी रस्ता व तद्अनुषंगिक बाबींचा विकास करणेसाठी "**सर्वसाधारण रस्ता अनुदान** " व "**विशेष रस्ता अनुदान**" अशा दोन प्रकारे रस्ता अनुदान म्हणुन मंजुर करण्यास सदर शासन निर्णयाद्वारे मान्यता देण्यात आलेली आहे.

1. **सर्वसाधारण रस्ता अनुदान** - राज्यातील अस्तित्वातील सर्व महानगरपालिका/नगर परिषद/नगर पंचायत हया सर्व साधारण रस्ता अनुदान मिळण्यास पात्र राहतील. '**ड**' वर्ग महानगरपालिकेसाठी दरवर्षी रु. 75.00 लक्ष मंजुर करण्यात आलेले असून कार्यान्वयन यंत्रणा संबंधीत महानगरपालिका/नगर परिषद/नगर पंचायत राहील. संबंधीत नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेची सर्वसाधारण सभा कामे निश्चित करेल. निश्चित करण्यात आलेल्या कामांना सक्षम प्राधिका-यांची तांत्रिक मान्यता प्राप्त झाल्यानंतर सदर कामांना प्रशासकीय मान्यता देण्याचे अधिकार संबंधीत नागरी स्थानिक स्वराज्य संस्थाचे आयुक्त/मुख्याधिकारी हे सक्षम राहतील.

2. **विशेष रस्ता अनुदान** - नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना नियमीत मिळणाऱ्या सर्वसाधारण रस्ता अनुदान व्यतिरीक्त विशेष रस्ता अनुदान मिळण्यास अस्तित्वातील सर्व महानगरपालिका/नगर परिषद/नगर पंचायत पात्र राहतील. तथापी सर्वसाधारण रस्ता अनुदान मंजुर करुन शिल्लक अर्थसंकल्पीय तरतुद व मागणीचे प्रस्ताव विचारात घेवुन आवश्यकते नूसार महानगरपालिका/नगर परिषद/नगर पंचायत यांना विशेष रस्ता अनुदान मंजुर करण्याची कार्यवाही करण्यात येईल. सदरचे अनुदान मंजुर करतेवळी खालील बाबींचा विचार करण्यात येईल. 1. नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेची वित्तीय परिस्थिती 2. स्थानिक गरज व प्राथमिकता 3. पूरक विकास प्रकल्पाकरिता 4. भौगोलिक परिस्थिती 5. नैसर्गिक आपत्ती 6. नागरीकरणाचा दर 7. पूरक दळणवळण साधानांचा विकास 8. हागणदारी मुक्त व स्वच्छ शहराची निर्मिती. इत्यादी "विशेष रस्ता अनुदान" अंतर्गत हाती घेण्यात येणाऱ्या कामांच्या अंमलबजावणी करिता कार्यान्वयन यंत्रणा आवश्यकतेनूसार शासन स्तरावरुन निश्चित करण्यात येईल. ज्या प्रकरणी शासन स्तरावरुन कार्यान्वयन यंत्रणा निश्चित करण्यात येणार नाही अशा प्रकरणी कार्यान्वयन यंत्रणा संबंधीत महानगरपालिका/नगर परिषद/नगर पंचायत राहील. "**विशेष रस्ता अनुदान**" अंतर्गत हाती घ्यावयाची कामे शासन स्तरावरुन निश्चित करण्यात येतील. ज्या प्रकरणी शासन स्तरावरुन कामे निश्चित करण्यात येणार नाहीत. अशा प्रकरणी सर्वसाधारण सभा कामे निश्चित करेल. "विशेष रस्ता अनुदान" अंतर्गत मंजुर निधीच्या मर्यादेत संबंधीत नागरी स्वराज्य संस्थाच्या आयुक्त/मुख्याधिकारी यांनी कामांना सार्वजनिक बांधकाम विभाग/महाराष्ट्र जिवन प्राधिकरण/सक्षम प्राधिकाऱ्याची तांत्रिक मान्यता घेवुन मा. विभागीय आयुक्त, यांच्या अध्यक्षते खाली गठित केलेल्या समिती समोर प्रशासकीय मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करावेत.

1. विभागीय आयुक्त - अध्यक्ष
2. संबंधीत जिल्हाधिकारी - सदस्य
3. कार्यान्वयन यंत्रणेचा सक्षम अधिकारी - सदस्य
4. संबंधीत महानगरपालिकेचे आयुक्त - सदस्य सचिव

"विशेष रस्ता अनुदान" अंतर्गत नागरी स्वराज्य संस्थाच्या हद्दित हाती घेण्यात येणाऱ्या कामाकरिता आवश्यक असणाऱ्या नाहरकत परवानग्या देण्याबाबत आवश्यकती कार्यवाही संबंधीत आयुक्त/मुख्याधिकारी यांनी करावे. "**रस्ता अनुदान**" अंतर्गतच्या कामांना प्रशासकीय मान्यता देतांना खालील बाबींचा विचार करण्यात यावा.

**अ.** सदरची कामे ही सार्वजनिक मालकीच्या ठिकाणीच करावीत. कामाचे स्वरुप सार्वजनिक असावे तसेच त्यामुळे सर्व समावेशक नागरीकांच्या प्राथमीक सोयी सुविधांमध्ये भर पडणार आहे. याची खातर जमा करणे व कुठल्याही खाजगी स्वरुपाच्या कामांना मान्यता देण्यात येवु नये.

**ब.** सदरची कामे संबंधीत शहराच्या विकास नियंत्रण नियमावली व विकास आराखडयाशी सुसंगत असल्याची खातर जमा करणे.

**क.** सदरची कामे सुरु करण्यापुर्वीच्या स्थितीचे व काम झाल्यानंतरच्या कामाचे चित्र (PHOTOGRAPH) काढुन ठेवणे व मागणीनूसार सादर करणे तसेच कामाचे त्रयस्थ पक्षाकडुन लेखा परिक्षण करुन घेणे कार्यान्वयन यंत्रणेस बंधनकारक आहे. **ड.** नागरी स्थानिक स्वराज्य संस्थाच्या हद्दितील रस्त्याची देखरेख-दुरुस्ती, डांबरीकरण, मोठया प्रमाणात नादुरुस्त झालेल्या रस्त्यांची पुर्नबांधणी, रस्ता-पुल व रेल्वे पुल

बांधणी, पदपथ बांधणी, भुयारी रस्ता इत्यादी रस्ता व तद्अनुषंगिक बाबींचा विकासाची कामे **"रस्ता अनुदान"** अंतर्गत हाती घेण्यात यावीत. रस्ता विकासाव्यतिरीक्त अन्य कोणत्याही प्रकारची कामे हाती घेण्यात येवु नयेत.

**इ.** सदर कामांसाठी "ई-निविदा" कार्यप्रणालीचा अवलंब करणे बंधनकारक राहील. "ई-निविदा" अंतीचा खर्च हा तांत्रिक व प्रशासकीय मान्यता देण्यात आलेल्या प्रकल्प खर्चापेक्षा जास्तीचा असल्यास, अशा जास्तीच्या खर्चासाठी कुठल्याही स्वरुपात अतिरिक्त अनुदान शासनाकडुन उपलब्ध करुन दिले जाणार नाही. महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग शासन निर्णय क्र. जीईएन-2015/प्र.क्र.82/ नवि-16 मंत्रालय मुंबई-32 दि. 8 मार्च 2016 नूसार राज्यातील महानगरपालिका/नगरपरिषद/ नगरपंचायत यांना **"रस्ता अनुदान"** चा निधी वितरीत करण्यात आलेला आहे. त्यानूसार नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेस खालील प्रमाणे निधी मंजुर झाला आहे.

(1) मंजुर "सर्वसाधारण रस्ता अनुदान" रु. 75.00 लक्ष (2) मंजुर "विशेष रस्ता अनुदान" रु. 194.00 लक्ष

करिता "सर्वसाधारण रस्ता अनुदान" अंतर्गत रु. 75.00 लक्षाची व "विशेष रस्ता अनुदान" अंतर्गत रु. 194.00 लक्षाची कामे महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग शासन निर्णय क्र. संकिर्ण/2015/प्र.क्र.90/नवि-16 मंत्रालय मुंबई-32 दि. 16 जानेवारी 2016 मधील 2 (ड) व 3 (ड) अनुक्रमे अन्वये निवड व निश्चिती करुन देणेबाबत प्रस्ताव सर्वसाधारण सभेसमोर सादर.

**विषय क्रं.०५** **प्रस्ताव**

महानगरपालिका संचित देणे असलेल्या रकमांचा भार महाराष्ट्र शासनाने उचलावा यावर सभाग्रहात चर्चा करुण निर्णय घेणे बाबत.

**सुचक** :- अनुजा तेहरा **अनुमोदक** :- हसिना बेगम साबेर चाऊस, अ.लतिफ अ.मजिद, इशरत फातेमा अ.शमीम

**विषय क्रं.०६** **प्रस्ताव**

अमरावती महापालिकेतील सहाय्यक आयुक्त श्री आर. बी. ओगले यांनी अमरावती येथील श्री शिवाजी शिक्षण संस्थेच्या मालमत्तांना शिक्षण कर व रोजगार हमी करात आयुक्तांची परवानगी न घेता स्वतःच्या अधिकारात नियमबाहय सवलत दिल्यामुळे तसेच त्यांना दिलेली पदोन्नती देखील नियमबाहय असल्याची बाब समोर आली असल्याने आयुक्त, अमरावती महानगरपालिका यांच्या प्रस्तावानूसार संबंधितांस सक्तीने सेवानिवृत्त करण्याबाबत केलेली शिफारस सभेने ठरावाव्दारे अमान्य केल्यामुळे नगरविकास विभागाचे शासन निर्णय क्रं. अमरावती-२००६/प्र.क्र.६२/नवि-२६ दि. १३ जुलै २०१६ महासभेचा ठराव निलंबित केला आहे. (सोबत शासन निर्णयाची प्रत जोडली आहे.)

याचप्रमाणे नांदेड महानगरपालिकेतील श्री प्रकाश माधवराव येवले, नियमबाहय सहाय्यक आयुक्त यांनी खालीलप्रमाणे गैरप्रकार केला आहे.

०१. महानगरपालिकेच्या मालकीची वजिराबाद भागातील मटन मार्केट जवळील सर्व्हे नं. ४८ मधील ७२.१६ एवढी जागा शासनाची मान्यता न घेता, स्वतःच्या वडील भावास विक्री करण्यास नियमबाहय मदत केली आहे.

०२. महानगरपालिकेच्या मालकीची वजिराबाद सर्व्हे नं. ७७ (जनता मार्केट) येथील जागा मा.उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद व जिल्हा सत्र न्यायालय, नांदेड येथे महापालिकेने जागा ताब्यात घ्यावी, असा निर्णय दिला होता. या प्रकरणांत आयुक्त महानगरपालिका, नांदेड यांनी सदर जागेवर कोणच्याही नांव परिवर्तन करु नये, असे लेखी आदेश काढले होते.

श्री प्रकाश माधवराव येवले, नियमबाहय सहाय्यक आयुक्त यांनी वरील सर्व बाब नजर अंदाज करुन आयुक्तांची मान्यता न घेता, स्वतःच्या अधिकारात सदर जागेवर अतिक्रमण केलेल्या नागरीकांच्या नावे नांव परिवर्तन करुन दिले.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ५९ (१) मधील तरतूदीनूसार वरील प्रकारच्या गैरव्यवहारात महापालिकेचे कर्मचारी / अधिकारी / स.सदस्य सहभागी असल्याचे सिध्द झाल्यास त्याला तात्काळ बडतर्फ करण्याची तरतूद आहे.

श्री प्रकाश माधवराव येवले, नियमबाहय सहाय्यक आयुक्त यांनी महानगरपालिकेच्या अनाधिकृत बांधकाम कार्यवाही करीत असतांना अडथळा केल्याबद्दल त्यांचेविरुध्द वजिराबाद पोलीस स्टेशन येथे तक्रार झाली होती. ती अदयापी न्यायप्रविष्ट आहे. याच कार्यवाहीत केलेल्या विभागीय चौकशीमध्ये संबंधित हे बाधीत मालमत्ता पाडतांना विरोध केल्याचे, सरकारी कामात अडथळा निर्माण केल्याचे सिध्द झाले आहेत. त्यामुळे तत्कालीन आयुक्त यांनी त्यांना पदावनत करण्याची गंभीर शिक्षा प्रस्तावित केली होती. परंतू महासभेने ती शिक्षा माफ केली आहे. असे असतांना त्यांच्या वर्तनात कोणतीही सुधारणा झालेली नाही.

श्री प्रकाश माधवराव येवले, नियमबाहय सहाय्यक आयुक्त यांच्या सहाय्यक आयुक्त पदापुर्वीचे पदोन्नतीचे प्रकरण मागील १७ वर्षापासून मा.उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद येथे न्यायप्रविष्ट असून ते सहाय्यक आयुक्त पदाची शैक्षणिक अर्हता धारण करीत नसल्यामुळे शासनाने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५ (४) नूसार त्यांच्या सहाय्यक आयुक्त पदाच्या पदोन्नतीस मान्यता दिलेली नाही. त्यामुळे ते आता सहाय्यक आयुक्त आहेत, असे कायदयातील तरतूदीनूसार ग्राहय धरता येत नाही. श्री प्रकाश माधवराव येवले, नियमबाहय सहाय्यक आयुक्त यांचे वरील सर्व प्रकरणांतील वर्तन पदाचा दुरुपयोग करुन प्रशासकीय शिस्तीच्या विरुध्द झाले असल्यामुळे महापालिकेतील अन्य कर्मचारी / अधिका-याच्या मनोधैर्यावर विपरीत परिणाम होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

वरील सर्व बाब विचारात घेता श्री प्रकाश माधवराव येवले, नियमबाहय सहाय्यक आयुक्त यांनी प्रशासकीय शिस्तीच्या विरुध्द वर्तन केल्याचे सिध्द होत असल्यामुळे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ५९ (१) व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ५६ मधील (क) व (ड) मधील तरतूदीनूसार शिक्षा लादण्याची ही सर्वसाधारण सभा सर्वानुमते मान्यता देते.

**सुचक**:- प्रमोद (बंडु) खेडकर **अनुमोदक** :- कल्याणकर बालाजी दत्तराव, गुरुखुदे सुंदरलाल किशनलाल, संगिता पृथ्वीराज राओत्रे

**विषय क्रं.०७** **प्रस्ताव**

कु. रत्नमाला रामदास अल्लमवाड, रा. नांदेड यांची जा.क्रं. ९१८/२०१०, नगरपरिषद कार्यालय रिसोड दिनांक २८.०९.२०१० रोजी सह शिक्षीका (शिक्षण सेवक) या पदावर अनु. जमाती या संवर्गामधून नियुक्ती झालेली असून दिनांक २७.०९.२०१३ रोजी शिक्षणसेवक कालावधी संपल्यानंतर जा.क्रं. नपरि/नियमित सेवा/प्राथ/शिक्षण/कावी-४६०/२०१४ दिनांक १२.०५.२०१४ अन्वये कायम वेतनश्रेणीत सामावून घेण्यात

आलेले आहे तसेच संबंधीत हे मुळ नांदेडचे रहिवासी असून पती पत्नी एकत्रीकरण अंतर्गत आंतरजिल्हा बदलीने नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड येथे एकतर्फी बदली करण्यासाठी रितसर अर्ज सादर केलेला आहे. तसेच मुख्याधिकारी नगरपरिषद, रिसोड जि. वाशिम यांचे कार्यालयीन पत्र क्रं. नपरि/८६०/२०१६ दिनांक २४.०६.२०१६ अन्वये उकत सहशिकेस नगरपरिषद रिसोड येथील आस्थापनेवरुन नावाशमनपा नांदेड येथील शिक्षण आस्थापनेवर आंतर जिल्हा बदलीस सदरील कार्यालयाची कांही हरकत नाही असे कळविलेले आहे.

करिता नावाशमनपाकेच्या शिक्षण आस्थापनेवर रिक्त असलेल्या जागेवर एकतर्फी बदलीने सदर सह शिक्षीकेस सामावून घेण्यासाठी सदरील प्रस्ताव सर्वसाधारण सभेसमोर सादर.

**सुचक**:- संजय गंगाधरराव मोरे **अनुमोदक** :- उमेश देवराव पवळे

**प्रशासकिय टिप्पणी**

श्रीमती रत्नमाला रामदास आलमवाड रा. नांदेड यांची जा.क्रं. ९१८/१० नगरपरिषद कार्यालय रिसोड दि. २८.०९.१० रोजी सह शिक्षीका (शिक्षणसेवक) या पदावर अनु. जमाती या संवर्गातुन नियुक्ती झालेली असून दि. २७.०९.२०१३ रोजी शिक्षणसेवक कालावधी संपल्यानंतर जा.क्रं. नपरि/नियमित सेवा/प्राथ.शिक्षण/कावि-४६०/२०१४ दि. १२.०५.१४ अन्वये वेतनश्रेणीत सामावून घेण्यात आले असून संबंधीत हे मुळ नांदेडचे रहिवासी असल्याने त्यांनी शासन परिपत्रक क्रं. ग्रामविकास व जलसंधारण विभाग, जिपब-०७११/प्र.क्र.११३/११/ आस्था-१४/२०११, दिनांक २९.०९.११ अन्वये पती पत्नी एकत्रिकरण अंतर्गत आंतर जिल्हा बदलीने नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड येथे एकतर्फी बदली करण्यासाठी रितसर अर्ज केलेला आहे. तसेच मुख्याधिकारी नगरपरिषद रिसोड जि. वाशीम यांचे कार्यालयीन पत्र क्रं. नपरि/८६०/१६ दि. २४.०६.१६ अन्वये उकत सहशिक्षीकेस नगरपरिषद आस्थापनेवरुन नावाशमनपा नांदेड येथील शिक्षण आस्थापनेवर अंतर जिल्हा बदलीस सदरील कार्यालयाची हरकत नसल्याचे कळविले आहे. तथापि, सदर शासन निर्णयानुसार दोघांपैकी एक जिल्हा परिषद व दुसरा हा जिल्हा परिषद / राज्य शासन / केंद्र शासन / स्वायत संस्थेचा (महानगरपालिका, नगरपालिका) / राज्य अथवा केंद्र शासनाच्या सार्वजनिक उपक्रमातील कर्मचारी / खाजगी संस्थेतील कर्मचारी असेल तर पती पत्नी एकत्रीकरणाचा लाभ देण्यात येतो. परंतु संबंधीत हया स्वायत संस्थेच्या कर्मचारी असून त्यांचे पती हे खाजगी संस्थेतील कर्मचारी आहेत. करिता उपरोक्त शासन निर्णय संबंधीतांना लागू होत नसल्यामुळे संबंधीतांना नावाशमनपा शिक्षण आस्थापनेवर सामावून घेता येणार नाही.

**विषय क्रं.०८** **प्रस्ताव**

मनपा हद्दीतील प्रभातनगर, श्रीनगर पोलीस कॉलनी, वर्कशाप, हर्षनगर भागातील पाणी वाहत जाऊन शाहुनगर भागात येथून येणा-या नाल्याचे नालीत रुपांतर झाले आहे. त्यामुळे परिसरातील नागरीकांना त्रास सहन करावा लागत आहे त्यामुळे शाहु नगर भागात नाल्याचे व ड्रेनेजचे पाणी रस्त्यावर वाहत असल्यामुळे सदर ठिकाणची नाली व ड्रेनेज लाईन सुरळीत प्रवाहीत करण्याची व्यवस्था प्रशासनाने करण्यासाठी ही सर्वसाधारण सभा सर्वानुमते मान्यता देते.

**सुचक**:- आनंद चव्हाण **अनुमोदक** :- किशोर भवरे

**विषय क्रं.०९** **प्रस्ताव**

नावाशमनपा हद्दीतील सिडको येथील रहिवाशी कु. दिपा प्रकाश गवळे ही मार्शल आर्ट खेळाडू असून तिच्या आजपर्यंतच्या मार्शल आर्टच्या प्रवासात तिला २२ पेक्षा जास्त राष्ट्रीय स्तरावरील सुवर्ण पदक मिळालेले आहेत.

तसेच व्हिएतनाम येथे होणा-या एशियन बिच गेम्ससासठी तिची निवड झाली असून या सपर्धेत भाग घेण्यासाठी तिला आर्थीक मदतीची गरज आहे सदर खेळाडू ही अनुसूचित जातीतील मागासवर्गीय आहे व तिची आर्थीक परिस्थिती अत्यंत हलाखीची आहे तिचे वडील श्री प्रकाश गवळे हे ऑटोरिक्षा चालक असून त्यावरच त्यांच्या कूटूंबाचा प्रपंच चालता. कु. दिपा प्रकाश गवळे या मुलीस मनपा तर्फे राष्ट्रीय खेळाडू म्हणुन आर्थीक मदत केली तर तिचे भावी आयुष्य उज्वल होवून देशपातळीवर तिचे नावलौकीक होईल. करिता आर्थीक दृष्टया कमकुवत असलेल्या मागास वर्गातील कु. दिपा प्रकाश गवळे या खेळाडूस सहानुभुतीपुर्वक विचार करुन तिला प्रवास खर्चासाठी लागणारे रु. ५०,०००/- ची आर्थीक मदत देवुन सहकार्य करणेसाठी ही सर्वसाधारण सभा सर्वानुमते मान्यता देते.

**सुचक**:- डॉ. ललिता मुकूंब बोकारे (शिंदे) **अनुमोदक** :- वैजयंती भिमराव गायकवाड

**विषय क्रं.१०** **प्रस्ताव**

राज्यातील जनतेचे प्रतिनिधीत्व करणा-या आमदार यांचे दोनदा वेतनवाढ झाली आहे. तसेच स्थानिक जनतेचे प्रतिनिधीत्व करणा-या नगरसेवकांचे मानधन अत्यल्प आहे. त्यामुळे नगरसेवकांचे मानधनात वाढ करणे करिता ही सर्वसाधारण सभा सर्वानुमते मान्यता देते.

**सुचक** :- स. शेर अली **अनुमोदक** :- सिंधुताई काकडे, अ. सत्तार अ. गफुर, स.सरजीतसिंघ गिल, गुरुखुदे सुंदरलाल

**विषय क्रं.११** **प्रस्ताव**

प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत सविस्तर माहिती देणे स. सदस्यांना शंका असल्यास त्या शंकेचे निरसन करणे

**सुचक** :- स. विरेंद्रसिंघ गाडीवाले **अनुमोदक** :- उमेश पवळे

**विषय क्रं.१२** **प्रस्ताव**

मनपा हद्दीतील मालमत्ताधारकांना बांधकाम परवानगी बाबतच्या संचिका प्रलंबीत असल्यामुळे उत्पन्नावर परिणाम होत असल्याने त्यावर चर्चा करुन निर्णय घेण्यास हि नावाशमनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते मंजुर करते.

**सुचक** :- स. विरेंद्रसिंघ गाडीवाले **अनुमोदक** :- पवळे उमेश

| | |
|---|---|
| **स्वाक्षरीत/-** | **स्वाक्षरीत/-** |
| **नगरसचिव** | **महापौर** |
| **नावाशमनपा नांदेड** | **नावाशमनपा नांदेड** |